CNR No. MHRG040036472016

## विशेष दिवाणी दावा क्र.१३/२०१८ मधील निशाणी क्र.३४ वरील आदेश

सदरहू अर्ज वादीने वादी क्र.१ यांचे नाव कमी करण्यासाठी अर्ज दाखल करण्यास झालेला ४ वर्षे ३ महिने १६ दिवसांचा विलंब माफ करण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.४१ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.४३ अन्वये टंकलेखनाच्या चुकीबाबत पुरशीस दाखल केली.

२. वादींचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, सदर दावा ग्रामस्थ कुंडेवहाल यांच्यामार्फत गावातील पंचपुढारी म्हणुन वादी क्र.१ ते १४ यांनी ग्रामस्थांच्या वतीने दाखल केलेला असुन वादी क्र.१ अनंता पांडूरंग भोईर हे दिनांक ०८/११/२०२० रोजी मयत असुन कोरोना महामारीचा प्रार्दुभाव असल्याने वादींना मृत्यू दाखला मिळण्यास विलंब झाला व वादी क्र.१ मयत झाल्यानंतर इतर वादींना ग्रामस्थ कुंडेवहाल यांचे पंचपुढारी म्हणुन दावा दाखल करण्याचा, चालविण्याचा व दाव्यातील हक्क अबाधित आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, वादी क्र.१ यांचे नाव दाव्यातुन कमी करण्यात यावे.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, वादी क्र.१ मयत झाल्याबाबत सुचित करण्याची जबाबदारी वादींची होती व प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिनांक २८/०३/२०२३ रोजी वादी क्र.१ मयत झाल्याबाबत सुचित केल्यानंतर १ वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतर अर्ज विलंबाने दाखल केलेला असुन सदर अर्ज १५९७ दिवसांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन

केले की, अर्जात नमुद केलेली कारणे योग्य नसुन अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, वादी, प्रतिवादी क्र.१ व २ यांचे वि. अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसुन येते की, वादींनी सदरहू दावा, दावा मिळकत ही वादींच्या मालकी हक्कातील, ताबेकब्जातील, वहिवाटीतील असुन दिनांक ३१/१२/२०१० रोजीचे प्रतिवादींनी खरेदीखत करण्याकरिता दाखल केलेले मुखत्यारपत्र रद्दबातल व बेकायदेशीर आहे असे जाहीर करून मिळण्याकरिता, दिनांक २३/०४/२०१० रोजीचे खरेदीखत दस्त क्र.पवल-३, ४१७९/२०१०, दिनांक ०५/०३/२०१३ रोजीचे खरेदीखत दस्त क्र.पवल-३, १८४९/२०१३ हे बेकायदेशीर व रद्दबातल असल्याचे जाहीर करून रद्द करून मिळण्याकरिता व मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. वादींनी निशाणी क्र.३९ अन्वये वादी क्र.१ अनंता पांडूरंग भोईर यांचे मृत्यू प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले असुन त्यांचा मृत्यू दिनांक ०८/११/२०२० नमुद असल्याचे दिसुन येते. सदरहू अर्ज दिनांक २४/०३/२०२५ रोजी दाखल करण्यात आला. वादी क्र.१ यांच्याविरूध्द अबेटमेंटचा आदेश झाल्याचे दिसुन येत नाही. प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने विलंब माफ करणे न्यायोचित होईल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## : <u>आदेश</u> :

वादींना वादी क्र.१ यांचे नाव दाव्यातुन कमी करण्याचा अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2025.12.22 17:51:57 +0530

पनवेल
दिनांक २२/१२/२०२५.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल